
ऐसे आर्त ज्याचे मनी । त्याची चक्रपाणी वाट पाहे ॥
>> पान 2

शेतीची उत्पादकता वाढविण्यावर शासनाचा भर-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस
>> पान 3

भीषण अपघातात एकाच कुटुंबातील चार ठार !
>> पान 4

दैनिक
# आपला विदर्भ




**सुविचार**
आपली स्वप्नं मोठी ठेवा.

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई


■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 294 ■ रविवार, दि. 06 जुलै 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# आम्ही एकत्र आलोय, कायम एकत्र राहण्यासाठी

## उद्धव ठाकरे यांचा विजयी मेळाव्यात निश्चय

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :महाराष्ट्राच्या राजकारणात आज एक नवा अध्याय सुरू झाला आहे. जवळपास २० वर्षांनंतर उद्धव आणि राज ठाकरे एकाच राजकीय मंचावर एकत्र आले आहेत. या मराठी विजयी मेळाव्यात बोलताना उद्धव ठाकरे यांनी एक मोठं आणि सूचक वक्तव्य केलं. आम्ही एकत्र आलोय, एकत्र राहण्यासाठी, असं उद्धव ठाकरे म्हणाले आहेत. त्यांनी एकत्र राहण्याचा निश्चय यावेळी बोलून दाखवला.**





विजयी मेळाव्यात बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, बऱ्याच वर्षानंतर राज आणि माझी राजकीय व्यासपीठावर भेट आहे. सन्माननीय राज ठाकरे असा उल्लेख करतो. राज यांनी अतिशय चांगली मांडणी केली आहे. आज भाषणापेक्षा आमचं एकत्र दिसणं महत्वाचं आहे. आमच्या दोघांतील 'अंतरपाट' अनाजी पंतांनी दूर केला. आता अक्षता टाकायची गरज नाही. एकत्र आलो आहे, एकत्र राहण्यासाठी.

'आम्ही कडवट देशाभिमानी मराठी हिंदू' : तत्पूर्वी, उद्धव ठाकरे यांनी आपल्या भाषणाची सुरुवात करताना सांगितलं, मला आज कल्पना आहे, अनेक बुवा महाराज व्यग्र आहेत, कोण लिंबू कापतंय? कोण रेडा कापतोय? माझ्या आजोबांनी या भोंदूपणाविरोधात लढा दिला होता आणि त्याच्यासाठी आज आम्ही एकत्र आलो आहे. वापरायचं आणि फेकून द्यायचं, असं यांचं काम आहे, आता आम्ही दोघं तुम्हाला फेकून देऊ. तुमच्या डोक्यावर बाळासाहेब ठाकरे यांचा हात नसता, तर आज तुम्ही कुठे असता? मधल्या काळात यांनी सुरू केलं होतं उद्धव ठाकरेंनी हिंदुत्व सोडलं. अरे आम्ही कडवट देशाभिमानी मराठी हिंदू आहोत.

'तुमच्याकडे सत्ता विधान भवनात असेल, आमच्याकडे सत्ता रस्त्यावर' : विजयी मेळाव्याची सुरुवात राज ठाकरे यांच्या भाषणानं झाली. राज यांनी आपल्या भाषणात सत्ताधाऱ्यांवर कडाडून टीका केली. या विजयी मेळाव्यात बोलताना राज यांनी सांगितलं, आजच्या मेळाव्याची घोषणा 'कोणताही झेंडा नाही मराठी हाच अजेंडा' हीच आहे. मराठीकडे कुणी वाकड्या नजरेनं पाहायचं नाही. तुमच्याकडे सत्ता आहे ती विधानभवनात आणि आमच्याकडे सत्ता आहे ती रस्त्यावर. एकेदिवशी शिक्षणमंत्री दादा भुसे माझ्याकडे आले होते आणि म्हणाले की, आम्ही काय सांगत आहोत ते ऐकून घ्या. मी म्हणालो ऐकून घेईन पण ऐकणार नाही. मला म्हणे केंद्राच्या शिक्षण धोरणात हिंदी मुद्दा आहे. पण दक्षिणेतील राज्य यांना विचारत पण नाहीत. उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान इथं तिसरी भाषा कोणती घेणार? मराठीच तिसरा विषय घ्यायला हवा. एक भाषा उभी करायला प्रचंड ताकद लागते. भाषा अशाच उभ्या राहात नसतात.

## जास्त नाटकं केली तर कानाखाली आवाज काढलाचा पाहिजे, राज ठाकरे कडाडले

**मुंबई/प्रतिनिधी :** पहिलीपासून हिंदी सक्ती करण्याच्या निर्णयाविरोधात ठाकरे बंधूंनी संयुक्त मोर्चा काढण्याचे ठरवल्यानंतर शासनाला जीआर रद्द करावा लागला . या पार्श्वभूमीवर आज वरळी डोममध्ये राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांचा विजयी मेळावा पार पडला . यावेळी सन्माननीय उद्धव ठाकरे अशी सुरुवात करत राज ठाकरे मराठीवरून पुन्हा कडाडले . महाराष्ट्रात राहणाऱ्या गुजरातींना मराठी आलीच पाहिजे यात वाद नाही .विनाकारण मारामारी करायची गरज नाही .पण जास्त नाटक केली तर कानाखाली आवाज काढलाच पाहिजे तुम्ही ..असं म्हणत राज ठाकरेंनी फटकारलं . यावेळी सभेला जमलेल्या मनसैनिकांसह सर्वांनी टाळ्या शिट्ट्या वाजवत दाद दिली . सरकारचं पुढचं राजकारण तुम्हाला जातीजातीत विभागण्याचा आहे असे सांगत राज ठाकरेंनी सरकारला सुनावलं.



या देशात भाषावार प्रांतरचना झाली ती मुळातच यासाठी ना की की प्रत्येक भाग त्या भाषेचा होता म्हणून.या सगळ्या गोष्टी का सुरू केल्यात ?कशासाठी सुरू केल्या ?यामागचं राजकारण काय ? आत्ताच सांगून ठेवतो ..आज तुम्ही सगळे मराठी म्हणून एकत्र आलात. मराठी म्हणून एकत्र आलात. यांचे पुढचं राजकारण तुम्हाला जातीमध्ये विभागायला सुरू करण्याचं आहे. पुन्हा जातीचा कार्ड खेळायला सुरुवात करणार. मराठी म्हणून तुम्हाला कधीही एकत्र येऊ देणार नाही. पुन्हा जातीपातीत विभागायला सुरुवात करतील.

## राज ठाकरेंचे भाषण संपताच उद्धव ठाकरेंनी हात मिळवला, पाठ थोपटली

**मुंबई/प्रतिनिधी :** कोणत्याही वादा पेक्षा महाराष्ट्र मोठा आहे. त्यामुळे आज उद्धव ठाकरे आणि मी (राज ठाकरे) एकत्र आलो आहे. आम्हाला एकत्र आणायचं बाळासाहेब ठाकरे यांना जमलं नाही कुणालाच जमलं नाही. ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जमलं, असं मनसेप्रमुख राज ठाकरे म्हणाले. राज ठाकरेंनी यावेळी विविध मुद्द्यांवर भाष्य केलं. तसेच स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्याबाबतची एक आठवणही राज ठाकरेंनी सांगितली. दरम्यान, राज ठाकरेंचं भाषण संपताच उद्धव ठाकरेंनी राज ठाकरेंसोबत हात मिळवला आणि त्यांची पाठही थोपटली. ठाकरे बंधूंचा यादरम्यानचा व्हिडीओ देखील समोर आला आहे.

आजचा मेळाव्याला घोषणा हीच आहे कोणताही झेंडा नाही मराठी हाच अजेंडा. मराठीकडे कुणी वाकड्या नजरेने पहायचं नाही, असा इशारा राज ठाकरेंनी दिला. तुमच्याकडे विधानभवनात सत्ता आहे आणि आमच्याकडे रस्त्यावर सत्ता आहे, असं राज ठाकरेंनी सांगितलं. एक भाषा उभी करायला प्रचंड ताकद लागते. भाषा अशाच उभ्या राहत नसतात. अमित शाह म्हणतात ज्याला इंग्रजी येत त्याला लाज वाटेल इंग्रजी येते म्हणवून. पण तुम्हाला येतं कुठे? आम्ही मराठी भाषा कधी लादली का? हिंदी फक्त २०० वर्ष पूर्वीची आहे. यांनी आत्ता चाचपडून पहिलं. यांना काय मज्जाक वाटली का सक्ती करायला?, असा सवाल राज ठाकरेंनी उपस्थित केला. मी बाळासाहेब ठाकरे यांना सांगितलं. सुरेश जैन यांना मुख्यमंत्री करायचं ठरलं आहे. मला बाळासाहेबांनी सांगितलं महाराष्ट्राचा मुख्यमंत्री मराठीच होईल. असे संस्कार झालेला व्यक्ती मराठीसाठी तडजोड करेल का?, असा सवाल उपस्थित करत मराठीसाठीची एकजूट कायम राहणं गरजेचं आहे, असंही राज ठाकरे म्हणाले.

## पहिल्या तिमाहीत आरबीआयच्या माहिती अनुसार महागाईत घसरणच अपेक्षित

**मुंबई/प्रतिनिधी :** 'आरबीआयने केलेल्या महागाईच्या अंदाजाप्रमाणेच आर्थिक वर्षातील पहिल्या तिमाहीत महागाई राहू शकते असे बँक ऑफ बडोदाने आपल्या अहवालात म्हटले आहे. नुकताच बँक ऑफ बडोदाने नवा अहवाल प्रसिद्ध केला आहे ज्यामध्ये भारतीय अर्थव्यवस्थेवर व आरबीआयच्या सद्यस्थितीतील निर्णयावर त्यांनी विस्तृतपणे प्रकाश टाकला. याशिवाय सध्या दैनंदिन गरजेच्या वस्तूंमध्ये सांख्यिकीय माहिती प्रमाणे स्वस्ताई राहू शकतो.

## ठाकरे बंधू एकत्र आल्यानं नक्कीच महाराष्ट्रात परिवर्तन घडेल, शिवसैनिक-मनसैनिकांच्या भावना

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्य सरकारनं त्रिभाषा धोरण मागे घेतल्यानंतर आणि हिंदी सक्तीचा निर्णय रद्द केल्यानंतर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या मोर्चाऐवजी शनिवारी विजय मेळावा मुंबईतील वरळी इथं पार पडणार आहे. या विजयी मेळाव्यासाठी मागील काही दिवसांपासून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून जोरदार तयारी सुरू होती. मराठी विजयी मेळाव्यासाठी नियोजन म्हणजे कोण कुठं बसणार? कोणाची भाषणं होणार? आणि दुसऱ्या पक्षातील नेते आले तर त्यांची व्यवस्था कशी असेल? याबाबत दोन्ही पक्षांकडून नियोजन सुरू होतं. अखेर शनिवारी मराठीचा विजयी मेळावा पार पडत असताना शिवसैनिक आणि मनसैनिकांमध्ये उत्साह असल्याचं पाहायला मिळत आहे. या मेळाव्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून हजारो नागरिक मुंबईत दाखल होत आहेत. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे उण्यापुऱ्या वीस वर्षांनंतर एकत्र येत आहेत. त्यामुळं शिवसैनिक आणि मनसैनिकांमध्ये मोठ्या प्रमाणात उत्साह आहे. जे महाराष्ट्रद्रोही आहेत. ज्यांनी महाराष्ट्रातील उद्योगधंदे गुजरातला नेऊन ठेवले. त्या महाराष्ट्रद्रोहींना ठाकरे बंधू नक्कीच धडा शिकवतील. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे तब्बल वीस वर्षांनंतर एकत्र येत आहेत. त्यामुळं महाराष्ट्राला न्याय मिळेल. ठाकरे बंधूंच्या एकत्र येण्यानं महाराष्ट्रात परिवर्तन नक्कीच दिसून येईल, अशा भावना शिवसैनिक आणि मनसैनिकांनी व्यक्त केल्या आहेत.

## लाडक्या बहिणींना जून महिन्याच्या हप्त्याचे वितरण सुरु, आदिती तटकरेंची घोषणा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्राच्या महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या जून महिन्याच्या हप्त्याचं वितरण आजपासून सुरु करण्यात येणार असल्याचं सांगितलं आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेला एक वर्ष पूर्ण झालं आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना जुलै २०२४ पासून सुरु करण्यात आली आहे. या योजनेचा १२ वा हप्ता महिलांच्या खात्यात या निमित्तानं जमा होईल. आदिती तटकरे यांनी जून महिन्याच्या सन्मान निधी वितरणाची प्रक्रिया सुरु करण्यात आल्याची माहिती सोशल मीडियावरुन दिली आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील सर्व पात्र लाभार्थ्यांना जून महिन्याचा सन्मान निधी वितरित करण्याची तांत्रिक प्रक्रिया आजपासून सुरू करण्यात आली आहे. योजनेच्या सर्व पात्र लाभार्थ्यांच्या आधार लिंकड् बँक खात्यात उद्यापासून हा सन्मान निधी जमा होणार आहे.

महायुती सरकारचा दृढ निश्चय, माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे ,



उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन व महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींचा दृढ विश्वास या बळावर मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची दमदार वाटचाल यापुढेही अशीच सुरू राहणार हा मला विश्वास आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना जुलै २०२४ पासून सुरु करण्यात आली आहे. या योजनेतून महिलांना प्रत्येक महिन्याला १५०० रुपये दिले जातात. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी २९ जूनला मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या जून महिन्याच्या हप्त्यासाठी ३६०० कोटी रुपये डीबीटीवर वर्ग करण्यात आल्याचं जाहीर केलं होतं. त्यानुसार मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांना जून महिन्याच्या हप्त्याची रक्कम आज (५ जुलै)पासून वर्ग करण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना दरमहा १५०० रुपये देण्यात येतात. योजनेच्या शासन निर्णयानुसार मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील ज्या महिला शेतकऱ्यांनी पीएम किसान सन्मान निधी योजना आणि नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेच्या लाभार्थ्यांना दोन्ही योजनांचे मिळून १२००० रुपये मिळतात. शासनाच्या डीबीटीच्या धोरणानुसार १८००० रुपये पाठवले जातात. त्यामुळे उर्वरित ६००० रुपयांची रक्कम दरमहा ५०० रुपयांप्रमाणे दिले जातात. अशा लाभार्थी महिलांची संख्या ७ ते ८ लाख रुपये इतकी आहे.

# वैष्णवांच्या मांदियाळीने अवघी पंढरी दुमदुमली!

## आषाढीसाठी १५ लाख भाविक दाखल

दैनिक आपला विदर्भ

**पंढरपूर/प्रतिनिधी :** शेकडो किलोमीटरचे अंतर पायी चालत निघालेल्या संतांच्या पालख्या शनिवारी पंढरीत पोहोचल्या. वैष्णवांची मांदियाळी आणि हरिनामाच्या गजराने अवघी पंढरी दुमदुमून गेली. उद्याच्या आषाढी एकादशीसाठी राज्य आणि परराज्यातून तब्बल १५ लाखांहून अधिक भाविक दाखल झाले आहेत. रविवारी पहाटे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सपत्नीक विठ्ठल-रुक्मिणीमातेची शासकीय महापूजा करणार आहेत.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्र्वर महाराज, जगद्गुरू तुकाराम महाराज यांच्यासह अनेक संतांचे पालखी सोहळे शुक्रवारी रात्रीच वाखरी मुक्कामी दाखल झाले होते. आज सकाळी या पालख्या पंढरीकडे मार्गस्थ झाल्या. यामध्ये संतश्रेष्ठ ज्ञानेश्र्वर महाराज, जगद्गुरू



तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील अखेरचा रिंगण सोहळा दुपारी वाखरी येथे पार पडला. त्यानंतर संत मुक्ताई आणि संत नामदेव महाराज यांच्यासह मानाच्या पालख्या वाखरी येथे दाखल झाल्या. सर्व संतांची भेट झाली. त्या नंतर क्रमाक्रमाने पालख्या पंढरीकडे मार्गस्थ झाल्या. संत ज्ञानेश्र्वर महाराजांची पालखी वाखरी येथून पुढे भाटे यांच्या रथातून मार्गस्थ झाली. पंढरपूरच्या जवळ आल्यावर सरदार शितोळे यांनी माउलींच्या पादुका गळ्यात घेत मार्गक्रमण केले.

वाखरीच्या रिंगण सोहळ्यासाठी पंढरपूरहून भाविक जातात. ज्या भाविकांना पालखी सोहळ्यात सहभागी होता येत नाही असे हजारो भाविक वाखरी ते पंढरपूर पायी चालत येतात. पंढरपूर नगरपालिकेच्या वतीने शहरात येणाऱ्या सर्व संतांच्या पालख्यांचे स्वागत करण्यात आले. पंढरीत प्रवेश केल्यानंतर प्रत्येक संतांच्या पालख्या आपआपल्या ठरलेल्या मंदिरात विसावल्या. मठ, मंदिरे संतभाराने गजबजले. हजारो वैष्णवांच्या टाळ-मृदंग आणि ग्यानबा तुकारामच्या जयघोषाने पंढरी नगरी दुमदुमून गेली. गेले अनेक दिवस सुरू असलेल्या वारीनंतर आता भाविकांना त्यांच्या सावळ्या विठुरायाच्या दर्शनाची आस लागली आहे.

## आषाढी एकादशी सोहळा; मुख्यमंत्र्यांची शासकीय महापूजा; नाशिक जिल्ह्याला सलग दुसऱ्या वर्षी मिळाला मान

**सोलापूर/प्रतिनिधी :** आषाढी एकादशीचा सोहळा आज होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या हस्ते विठ्ठल-रुक्मिणी मातेची शासकीय पूजा होणार आहे. या शासकीय पूजेवेळी मानाचे वारकरी म्हणून नाशिकच्या दाम्पत्यांना मान मिळाला आहे.

आषाढी महापूजेसाठी कैलास दामू उगले (वय ५२) व कल्पना कैलास उगले (वय ४८) रा. जातेगांव, ता. नांदगांव, जि. नाशिक यांना मान मिळाला आहे. या दाम्पत्यांचा कैलास उगले यांचे वडील माजी सैनिक होते.

आषाढीच्या सोहळ्यासाठी पंढरपुरात १५ लाखाहून अधिक भाविक दाखल झाले आहेत. विठ्ठलाचे दर्शनाची रांग पाच किलोमीटर पर्यंत पोहोचली आहे. चंद्रभागेच्या तीरावर स्नान करण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली आहे.

**नाशिक जिल्ह्याला सलग दुसऱ्या वर्षी मिळाला मान**

पंढरपूर येथे आषाढी एकादशी



निमित्त श्री विठ्ठलाच्या शासकीय महापूजेचा मानाचा वारकरी म्हणून बाळू शंकर अहिरे ( वय ५५) व आशाबाई बाळू अहिरे ( वय ५०, रा. अंबासन, ता. सटाणा, जिल्हा नाशिक) या दापत्याची मागील वर्षी २०२४ मध्ये निवड करण्यात आली होती. आता सलग दुसऱ्या वर्षी नाशिक जिल्ह्यातील वारकरी दांपत्याला हा मान मिळाला आहे. तर २०२३ मध्येही कार्तिकी एकादशीला एकादशीच्या महापूजेचा मान नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुक्यातील बबनराव घुगे आणि वत्सला घुगे या दांपत्याला मिळाला होता.

## लोकशाहीच्या सिंचनातून विश्वहिताचा वटवृक्ष

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी परवा घानाच्या संसदेत केलेले भाषण हे केवळ औपचारिक नव्हते, तर जागतिक राजकारणाच्या भविष्यासाठी ते दिशादर्शक असेच. विश्वहितासाठी ‘ग्लोबल साऊथ’चा आवाज आवश्यक आहे, या पंतप्रधानांच्या विधानातून भारताने एक स्पष्ट संदेश जगाला दिला. म्हणूनच लोकशाहीच्या सिंचनातून भारतरुपी बहरलेला हे विश्वहिताचा वटवृक्ष जगासाठी आशेचा किरण ठरावा. जगाच्या विकासासाठी ‘ग्लोबल साऊथ’चा आवाज महत्त्वाचा असाच आहे,’’ अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घाना देशाच्या संसदेत ‘ग्लोबल साऊथ’च्या अस्तित्वावर आफ्रिकेच्या मातीतून जे भाष्य केले, त्याला विशेष महत्त्व प्राप्त होते. समकालीन जागतिक प्रगतीमध्ये ‘ग्लोबल साऊथ’च्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जो भर दिला आहे, तो आंतरराष्ट्रीय संबंधांच्या विकसित होत असलेल्या संदर्भात अतिशय महत्त्वपूर्ण असाच. त्यांचे विधान भू-राजकीय गतिशीलतेतील बदल अधोरेखित करणारे असून, जागतिक व्यवस्थेत होत असलेला अन्याय अधोरेखित करणारा आहे. या एका विधानात त्यांनी जागतिक व्यवस्थेतील असमतोलावर नेमकेपणाने बोट ठेवले असून, भारताची भूमिका नेमकेपणाने मांडली. त्याचवेळी विकसनशील देशांच्या ऐक्याचे आवाहनही त्यांनी केले आहे. ‘ग्लोबल साऊथ’ ही संज्ञा दक्षिण गोलार्धातील आफ्रिका, आशिया, लॅटिन अमेरिका आणि ओशनिया खंडातील विकसनशील देशांसाठी वापरली जाते. हे देश ऐतिहासिकदृष्ट्या वसाहतवाद, आर्थिक शोषण आणि पाश्चिमात्य प्रभुत्वाने पिचलेले असून, या देशांची लोकसंख्या जगाच्या एकूण लोकसंख्येच्या जवळपास ७० टक्क्यांपेक्षा जास्त. मात्र, जागतिक व्यवस्थेत त्यांचे प्रतिनिधित्व अत्यंत मर्यादित असेच. आज जागतिक निर्णय केंद्रे पश्चिमी देशांमध्ये केंद्रित आहेत. यात संयुक्त राष्ट्र, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक, जागतिक व्यापार संघटना यांसारख्या संस्थांचा नामोल्लेख प्राधान्याने करावा लागेल. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने पाकपुरस्कृत पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतरही भारताचा विरोध कायम असताना, पाकला केलेली आर्थिक मदत दहशतवादाला प्राधान्य देणारी होती. नाणेनिधी कोणाच्या इशाऱ्यावर काम करते, हे नव्याने सांगण्याची गरज नाही. या सर्व संस्थांमध्ये अमेरिका आणि युरोपच्या हितसंबंधांना प्राधान्य दिले जाते. या संस्थांमधूनच जागतिक धोरण आखली जातात. म्हणूनच, विकसनशील देशांचा आवाज ऐकलाजात नाही. यामुळेच पंतप्रधान मोदी यांनी घानामधून दिलेला संदेश हे एकप्रकारे राजनैतिक घोषणापत्रच होते. भारत स्वतः ‘ग्लोबल साऊथ’मधील देश असूनही आज जागतिक पातळीवर उदयास येत आहे. ‘जी-२०’ अध्यक्षपद, ‘ब्रिक्स’ तसेच ‘एससीओ’सारख्या संस्थांमध्ये त्याचा सक्रिय सहभाग आहे. त्याचवेळी, दक्षिण आशिया ते आफ्रिकेपर्यंतच्या देशांशी त्याचे चांगले संबंध आहेत. यामुळेच, भारत आज ‘विकसनशील राष्ट्रांचा नैतिक आवाज’ म्हणूनही उदयास येत आहे. भारताच्या अध्यक्षतेखाली ‘जी-२०’ शिखर परिषदेत ‘ग्लोबल साऊथ समिट’ आयोजित करण्यात भारताचा मोलाचा वाटा होता. ‘वॅक्सिन मैत्री’, ‘डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर’, सौरऊर्जा आघाडी अशा उपक्रमातून भारताने ‘ग्लोबल साऊथ’चा आत्मविश्वास वाढीस लावला आहे. आफ्रिकेतील संसदेपुढे बोलताना भागीदारी, समानता आणि सन्मान याचा केलेला उल्लेख अतिशय अर्थपूर्ण असाच आहे. ‘सबका साथ, सबका विश्वास’ हे भारताचे धोरण असल्याचेच त्यांनी अधोरेखित केले आहे. आम्ही एकत्र प्रगती करू इच्छितो, असा त्यांनी दिलेला संदेश म्हणूनच मोलाचा असाच आहे. आफ्रिकेच्या संदर्भात, भारताचे धोरण मदतीऐवजी सहभागी गुंतवणुकीवर आधारित आहे. यात वीज, आरोग्य, शिक्षण, फार्मा, कृषी या क्षेत्रांचा समावेश आहे. नवी जागतिक व्यवस्था प्रत्यक्षात आणण्याची गरज भारताने विविध आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवरून यापूर्वीही विशद केली आहे. पश्चिमी वर्चस्वाऐवजी विविध देशांचे समान योगदान असलेली व्यवस्था उदयास येणे आवश्यक आहे. घानामधील भाषणाने या शक्यतेत वाढ झाली आहे. असे प्रत्यक्षात झाले, तर विकसनशील देशांमध्ये तांत्रिक, आर्थिक, पर्यावरणीय सहकार्य वाढेल. व्यवस्थात्मक सुधारणेतही आमूलाग्र बदल होईल. नाणेनिधी, जागतिक बँक, संयुक्त राष्ट्र यांसारख्या संस्थांमध्ये ‘ग्लोबल साऊथ’चे प्रतिनिधित्व वाढेल. ‘ग्लोबल साऊथ’मध्ये आर्थिक, राजकीय आणि सामाजिक विविधता प्रचंड असून, चीन, ब्राझील, केनिया, बांगलादेश, भारत यांचे हितसंबंध, धोरणे वेगवेगळी आहेत. चीन, पाक यांसारखे काही देश पंतप्रधान मोदी यांच्या भूमिकेला भारताचे जागतिक वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न असे स्वाभाविकपणे मानतील. मात्र, भारताने अशी भूमिका पहिल्यांदाच मांडलेली नाही. यापूर्वीही वेळोवेळी भारताने जागतिक व्यवस्थेत बदल का आवश्यक आहेत, ते ठळकपणे नमूद केले आहे.

# ऐसे आर्त ज्याचे मनी । त्याची चक्रपाणी वाट पाहे ।।




वारकरी संप्रदायाने श्री विठ्ठल हे आपले आराध्य दैवत आणि त्याची निष्काम भक्ती ही स्वतंत्र जीवननिष्ठा मानली,महाराष्ट्रधर्माचे जे प्रणेते संत सत्पुरुष मानले जातात,त्यापैकी श्रीसंत ज्ञानेश्वर-नामदेव-एकनाथ-तुकाराम हे प्रमुख वारकरी संतचतुष्टय.श्रीविठ्ठलोपासक वारकरी संतपुरुष आणि स्त्रियांनी रचलेले अभंगकाव्य हे या संप्रदायाला शेकडो वर्षांपासून प्रतिकुलतेत सतत उभारी देत राहिले.वर्षानुवर्षांच्या पंढरीच्या सामूहिक वारीची साधना त्यांची एक महाशक्ती ठरली.आजही लाखोंच्या संख्येने पांडुरंगाच्या भेटीसाठी निरपेक्ष यात्रा करणारा,काही सुनिश्चित सदाचार नियमितपणे करीत राहून अवघ्या विश्वाला एक आदर्श वस्तुपाठ देणारा,तळागाळापर्यंत पोहोचू शकलेला दुसरा संप्रदाय जगात दाखविता येणार नाही.एक वैशिष्टयपूर्ण आणि कदाचित सर्वाधिक लोकस्वीकृत असलेल्या या संप्रदायात त्याची निरंतरता आणि पुरातनता,संघटन आणि सुलभ आचारधर्म, काळावर मात करण्याची क्षमता लक्षणीय आहे.

आले आले हे हरिचे डिंगर।वीर वारीकर पंढरीचे ।।

ध्वजा कुंचे गरुडटके।वैष्णव चालले नेटके ।।

आले वैष्णवांचे दळ।भेणे पळे कलिकाळ ।।

असे संत नामदेव महाराज वर्णन करतात. पंढरीचे वारीकर-वारकरी म्हणजे वैष्णवांचे दळ आहे,आणि त्याच्यामुळे साक्षात कलिकाळ हा भिऊन पळून जातो.अशी विश्वासकता वारीमधील वारकऱ्यांविषयी संत नामदेवांनी एका अभंगात वर्णिली आहे.गेल्या साडेसातशे वर्षांच्या वारकरी सांप्रदायिक वाटचालीवर एक साधा दृष्टिकोन टाकला तरी त्याची अनेक वैशिष्ट्ये त्या त्या वेळचे चढ उतार आपल्या ध्यानी येतात.पंढरपूरची वारी म्हणजे मराठी संस्कृतीचे एक विलोभनीय स्वरूप आहे.लोकमानसाचे आणि लोकप्रवाहाचे सांस्कृतिक मानस वारीतून दरवर्षी प्रकट होते.वारकऱ्यांचा हा देव लोकदेवआहे.तो त्यांच्यातच राहतो,त्यांच्यासारखाच वावरतो.माळकरी त्याला उराउरी केव्हाही पूर्व अट वा पूर्व व्यवस्था न करता भेटू शकतो.सगळा वावर अगदी मनमोकळा.टाळ,मृदंग,चिपळयांच्या नादघोषातून उचंबळत्या,लक्ष लक्ष भक्तीभावपूर्ण हृदयातून अमृताहूनी गोड विठ्ठल नामाचा गजर करीत महाराष्ट्रातूनच नव्हे तर जिथे जिथे मराठी माणूस आहे,त्या भारतवर्षाच्या सर्वदूर कानाकोपऱ्यातून सुशिक्षित-अशिक्षित,श्रीमंत-गरीब,स्त्री-शूद्रादी आबाल-वृद्ध जीवीच्या आवडीने पायी अनवाणी ‘‘न लगे मुक्ती धन संपदा ।संतसंग देई सदा ।।‘‘ या ओढीने आणि आवडीने पंढरीच्या वारीसाठी धावत जातात.

ज्ञानदेव-नामदेवांच्या पूर्वकाळापासून एक विठ्ठलोपासक लोकसंप्रदाय म्हणून वारकऱ्यांचा इतिहास सांगता येतो.अगदी यादवकाळातील एक बहुजनमान्य लोकसंप्रदाय म्हणून या पंथाला आठ शतकापूर्वीच राजमान्यता मिळालेली होती.योगिराज ज्ञानदेव आणि भक्तराज नामदेव यांच्या योगभक्तीने भक्त-भागवतांची ही उपासना पुढच्या काळात अधिक बलवान बनली.वारकरी पंथियांनी सातत्याने मायमराठीची सेवा केली.मराठीपणटिकविले. पांडित्यप्रदर्शनाचे प्रस्थ वाढू दिले नाही. लोकभाषा,लोकछंद,लोकमाध्यमे आणि लोकसमाज यांची जवळीक सतत वाढती ठेवली.वारकरी संप्रदायाच्या अशा कितीतरी बलस्थानांबद्दल असेच आणखी पुष्कळ लिहिता येण्यासारखे आहे.आज वारकरी हीच एक तळागाळापर्यंत पोहोचलेली इतिहासदत्त सामाजिक,सांस्कृतिक आचार-विचार धारा आहे.भक्ती ही जर समाजपरिवर्तनासाठी उपयोगी शक्ति ठरायची असेल तर वारकरी संप्रदायाकडे अपेक्षेने पाहिले जाते.या पंथाची प्रकृती सौम्य व समन्वयवादी.पण त्यात विद्रोहाची सुप्त शक्तीही असल्याने आत्मज्ञाबरोबर आत्मभान घडविणारा एक लोकमान्य संप्रदाय म्हणून आजच्या सैरभैर काळात त्याच्याकडून समंजसपणाची विशेष अपेक्षा करणे अनपेक्षित का ठरू नये.

या संप्रदायाने संपूर्ण महाराष्ट्रातून अनेक दिंड्यांतून लाखोंचा समुदाय एकत्र आणला,एकांतिक भक्तीचा पुरस्कार न करता सामुदायिक भक्तीला प्रोत्साहन दिले.त्यातूनच वारीची संकल्पना निर्माण झाली असावी.आज मात्र तोच लाखो वारकरी घरातच मास्क लावून एकांतात हे सावट दूर करण्यासाठी पांडुरंगाचरणी दिनपणे याचना करणार आहे.

वेगवेगळ्या दैवतांच्या तीर्थयात्रा आणि पंढरपूरची वारी यात मूलतः काही फरक आहे.काशी वा हरिद्वारची वारी होत नसते,तर ती तीर्थयात्रा असते,पण पंढरीची वारीअसते. तीर्थयात्रा ही प्रत्येक व्यक्तीस आपल्या सोयीनुसार परिस्थिती प्रमाणे करता येते,तिच्यासाठी कोणतेही काळवेळाचे बंधन नसते.मात्र पंढरपूरची वारी ही मात्र आषाढी आणि कार्तिकी एकादशी याच दिवशी होत असते. आणि चंद्रभागा नदीच्या तीरावर महाराष्ट्राचे जे लोकदैवत अठ्ठावीस युगे उभे आहे त्याच्याशी या वारीचा संबंध येतो.आणि त्याला उराउरी भेटण्यासाठी तहानभूक विसरून पायी चालत कष्टत लाखो लोकांचा महासागर पंढरपूर येथे एकत्र येत असतो.जनमानसात वारी म्हणजे पंढरीची वारी असाच समज रूढ झालेला आहे.वारी आणि वारी करणारा वारकरी हा महाराष्ट्रीयच नव्हे,तर एकूणच भारतीय सांस्कृतिक परंपरेचा प्राणभूत घटक आहे. त्याचे ऊर्जाकेंद्र पंढरपूर आणि श्री विठ्ठल आहे. श्रीक्षेत्र पंढपूर-श्री विठ्ठल आणि वारकरी यांचे घट्ट संजीवक नाते आहे.महाराष्ट्रातून व महाराष्ट्राबाहेर दहा ते बारा लाख वारकरी पायी वारी,दिंड्या घेऊन तीस-चाळीस दिवसांपासून पंढरपूरला येत असतात.यापूर्वी सर्वच प्रकारच्या महासत्ता आल्या गेल्या त्यांची जुलूम जबरदस्ती झाली,प्लेगच्या आजाराच्या साथीसह महामारी,नैसर्गिक संकटे आली गेली परंतू वारीत अभंग राहिली.

महाराष्ट्रातील मराठी संतांनी समाज प्रबोधनासाठी आणि भक्तिमार्गाच्या प्रचारासाठी पंढरीच्या वारीचा योग्य उपयोग करून घेऊन अंधश्रद्धा,कर्मकांड,व्रतवैकल्यांचा अतिरेक, जातीधर्मातील बेबनाव यांना पायबंद घालून एक विराट असे समूहमन तयार केले.त्यासाठी लोकपरंपरा,कीर्तन,प्रवचन,भजन यांचे सादरीकरणाचे माध्यम स्वीकारले.ओवी-अभंगांची रचना केली आणि वारीच्या प्रवासाला एक प्रयोजन मिळवून दिले. वारी करणे हा केवळ उपचार राहिला नाही तर,या दिंडी सोहळ्यात समूहमने तयार करून त्याच्यात एकच विचार एकच आचार मिळवून दिला आणि तो सर्वसमावेशक आणि सर्वंकष असा ठरला.समूहाचे मानसशास्त्र ओळखून या संप्रदायातील लोकमान्य धुरीणांनी परंपरेला धक्का न लावता परिस्थिती नुसार भक्तीविचारांचे नियमन केले,संघटन केले असे म्हणता येईल.



वारी म्हणजे पंढरपूरची वारी हे आपण गृहीतच धरलेले असते.संत ज्ञानदेव,संत नामदेव,संत एकनाथ,संत तुकाराम,संत निळोबाराय अशा नामवंत संतांनी वारकरी होण्यात धन्यता मानली.‘‘जाय जाय तू पंढरी ।होय होय वारकरी ।।‘‘ असे संतांचे उदगार याची युगानुयुगे साक्ष देत आहेत.अशी ही वारी कधीपासून सुरु झाली.त्याचा प्रारंभ कोणी केला ?वारीची ही रीत कोणी घालून दिली ?ती केव्हापासून अस्तित्वात आली असावी ?या प्रश्नांचे उत्तर निर्णायकपणे आजही कोणी देऊ शकत नाही.याचा निश्चित पुरावा उपलब्ध होत नाही.संत ज्ञानेश्वरांपूर्वी वारीची प्रथा होती हे मात्र निश्चित.ज्ञानेश्वरांचे वडील विठ्ठलपंत हे आषाढी-कार्तिकी वारीस पंढरपूरला गेल्याचा उल्लेख संत नामदेव महाराजांनी केला आहे.

वारीची प्रथा मुस्लिमपूर्व काळातही होती हे दाखवणारा शिलालेख धारवाड जवळच्या हेब्बळी गावात सापडला असून तो कन्नड भाषेत आहे. ताम्रपट व शिलालेख यांच्या आधारे पंढरपूर व तेथील विठ्ठल यांच्या इतिहासावर प्रकाश टाकण्याचे प्रयत्न इतिहास संशोधकांनी केलेले आहेत.डॉ भांडारकर,ग.ह.खरे,महाकवी दत्तोपंत बेंद्रे,डॉ दलरी, फरुकहार,स्टीव्हनसन,निकॉल मॅकनिकॉल,डॉ मिराशी,डॉ तुळपुळे वैगरे महाराष्ट्रीयन व पाश्चात्य संशोधकांनी पंढरपूरचा प्रामाणिक इतिहास शोधण्याचा प्रयत्न केला. तरीसुद्धा यांच्या प्राचीन स्वरूपाविषयी व प्रारंभकालाविषयी सर्वमान्य असे विधान कोणीही करू शकलेले नाही.

ज्ञानेश्वरीत अनेक ठिकाणी वारी शब्द येतो. अनेक ठिकाणी रसभरीत भक्तिपूर्ण वर्णन आढळते,‘‘आले आले हे हरीचे डिंगर । वीर वारीकर पंढरीचे ।।‘‘अशा शब्दात वारकऱ्यांचे सुंदर दर्शन घडवले आहे.वारीत भक्तिप्रधानता असते.देवाच्या दर्शनाबरोबरच संतदर्शनही महत्वाचे असते.म्हणून प्रत्येक शुद्ध एकादशीस देवाची तर वद्य एकादशीस संतांची वारी असते. पंढरी ही देवाची वारी,तर आळंदी ही संतांची वारी आहे.वारीशब्दाचा अर्थ म्हणजे येरझारपंढरपूरची वारी करावयाची म्हणजे आपल्या घरुन पायीचालत पांडूरंगाच्या भेटीला पंढरपुरला जायचे आणि भगवंताला भेटून परत घरी यायचे.वारकरी वर्षातून अनेकदा वारीला जातात.पंढरीचा वारकरी । वारी चुको न दे हरी ।।या उदात्त भावनेने लाखोंच्या संख्येने भक्तगण या पायी वारीमध्ये सहभागी होतात आणि चालत २१ दिवसांचा प्रवास करत पंढरपूर च्या विठ्ठलाला येऊन भेटतात.

महाराष्ट्राच्या अध्यात्मिक आणि सांस्कृतिक विचारप्रवाहाच्या निर्मितीमध्ये आणि रक्षणामध्ये वारकरी संप्रदायाचे योगदान अतुलनीय आहे.मानवी जीवनाच्या ऐहिक आणि पारलौकिक कल्याणाचा अत्यंत प्रशस्त असा राजमार्ग वारकरी संतांनी घालून दिला आहे.‘‘मोडुनिया वाटा सूक्षम दुस्तर ।केला राज्यभार चाले ऐसा ।।‘‘ किंवा ‘‘आड वाटे जाता लावी नीट सोई ।धर्मनीत तेही ऐसी आहे ।।या धर्मनितीला अनुसरून भुलों नेदी वाट।करी धरुनि दावी नीट ।।‘‘ हे कार्य संतांनी केले आहे. आत्मकल्याणाचे मार्ग विशिष्ट अधिकारसंपन्नेतेच्या आग्रही अपेक्षांनी निश्चित झालेले असताना संतांनी सकल समाजासाठी आत्म आणि परकल्याणाचा मार्ग विस्तृत करून दिला,हे कार्य समाजपरिवर्तनाच्या दृष्टीने फार महत्वाचे ठरते.

समन्वयाकडे नेहमीच वारकरी संप्रदायाचा कल राहिला आहे.म्हणून इतकी वर्षे हा संप्रदाय टिकलाही आणि वृद्धिंगत होत आहे. नामासारखे सोपे साधन,रिकाम्या वेळेतील वारीची साधना,कीर्तनासारखे आत्मीय प्रबोधनाचे माध्यम गळ्यात तुळशीमाळ धारण करण्याने येणारे सहज वैराग्य,कपाळास गोपीचंदन आणि बुका या सहज क्रियेतून जीवनाचा सर्वांगीण उत्कर्ष वारकरी संप्रदाय साधून देतो,त्याचे सोपेपणा हेच त्याचे वेगळेपण आहे.महाराष्ट्रात अनेक पंथ-उपपंथ, संप्रदाय अनेक वर्षपासून गुण्यागोविंदाने नांदले.या संप्रदायात वैचारिक भेद जरूर होता.परंतु सर्वच सांप्रदायिकांनी ईश्वरभक्तीच्या माध्यमातून मानवतावादाचीच उपासना केली.त्यात नाथ महानुभाव, शैव, दत्त, सुफी,नागेश,समर्थ अशी मुख्य तर गाणपत्य,सूर्योपासक,शक्तीउपासक असेही उपपंथ निर्माण झाले.वैदिक आणि अवैदिक अशा परंपरा इथे परिपूष्ठ झाल्या.तांत्रिक-मांत्रिकांची शाक्त उपासनाही महाराष्ट्रात आढळते.या सर्वांच्या उपासना पद्धतीत भिन्नता आहे.प्रत्येकाची देवता,उपासना पद्धती,व्रत,नियम यात भेद आहे.मात्र या पार्श्वभूमीवर वारकरी संप्रदाय निराळा उठून दिसतो.वारकरी संप्रदायाने विठ्ठल भक्तीची परंपरा निर्माण करून भक्तीच्या क्षेत्रात जे नवचैतन्य आणि मुक्ततेचे वातावरण निर्माण केले त्याला तोड नाही. वारकरी संप्रदायाने वैदिक आणि औपनिषादिक तत्वज्ञानाबरोबरच आजच्या दलित,ग्रामीण,स्त्रीवादी,जनवादी,कृषिनिष्ठ,पर्यावरणविषयक जाणिवा समृद्ध करणारे अशा विविध वाङ् मयीन संवेदनांचे बीजारोपणच केले नाही तर अध्यात्म दर्शनाबरोबरच या जाणिवांची पायाभरणी केली.त्यातूनच प्रेरणा घेऊन ‘‘इवलेसे रोप लावियले द्वारी ।तयाचा वेलू गेला गगनावरी‘‘ असे त्याचे प्रत्यंतर आज येताना दिसते.

आषाढ महिन्यातील शुद्ध एकादशीस जी ही यात्रा भरते त्या एकादशीस देवशयनीएकादशी असेही म्हणतात.आषाढी यात्रा ही पंढरीतील महायात्रा म्हणून सुद्धा ओळखली जाते.भगवंत या एकादशीपासुन शयन करतात.आषाढी एकादशीपासुन चातुर्मास चालु होत.चातुर्मासातअधिकाधिक विठ्ठल गुणांचे रुपाचे श्रवणकीर्तन करुन भक्तविठ्ठल प्राप्तीसाठी प्रयत्न करतात.वारकऱ्यांचे नव्हे,तर अनेक वैष्णवसंप्रदायांचे,केवळ महाराष्ट्रीयांचेच नव्हे तर कर्नाटक,आंध्र,तमिळनाडू,उत्तरप्रदेश,मध्यप्रदेशादि अनेक प्रांतातील अनेक लोकांचे,मराठी भाषिकांचेच नव्हे तर अनेकविध भाषिकांचे परमात्मा पंढरीनाथ हे आराध्य दैवत आहे.अनेक संतानी या देवाचे माहात्म्य गाइलेले आहे.स्वत: पांडुरंगाने नामदेवांच्या जवळ आपले गुपित सांगताना म्हटले आहे,‘‘आषाढी कार्तिकी विसरु नका मज । सांगतसे गूज पांडुरंग ।।‘‘

शेकडो वर्षे झाली.काळ बदलला.यंत्रातंत्राचं आधुनिक युग आलं.पण आषाढी वारी सुरु आहे. एका पिढीची जागा दुसरी पिढी घेते.दर आषाढीला वारीची वाट संतप्रेमानं उचंबळून येते विठुनामाचा गजर टीपेला पोहोचतोआषाढी आणि कार्तिकी या दोन्ही वाऱ्या संप्रदायाने प्रमाणभूत मानल्या असून वारी चुकू नये म्हणून प्रत्येक वारकरी त्या परमेश्वराला विनंती करीत म्हणत असतो,‘‘हेचि व्हावी माझी आस ।जन्मोजन्मी तुझा दास।पंढरीचा वारकरी वारी चुको न दे हरी।।‘‘श्रीविठ्ठल हा सुद्धा वारकरी लोकांचे उपास्यदैवत आणि सखा असल्याने ‘‘ऐसे आर्त ज्याचे मनी । त्याची चक्रपाणी वाट पाहे ।।‘‘ या भावनेने भक्तांची वाट पाहात अठ्ठावीस युगे ज्या विटेवरी उभा आहे

**– रवींद्र मालुसरे**
**अध्यक्ष, मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई**





DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# शेतीची उत्पादकता वाढविण्यावर शासनाचा भर-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## ■ पाच वर्षात कृषी क्षेत्रात २५ हजार कोटींची गुंतवणूक करणार
## ■ पंढरपूर येथे कृषी पंढरी कृषी प्रदर्शनाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन





**पंढरपूर/प्रतिनिधी :** शेतकऱ्याला शेती फायद्याची व्हावी यासाठी उत्पादन खर्च कमी करून उत्पादकता वाढावी असा राज्य शासनाचा प्रयत्न आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. आगामी काळात शेतीच्या सर्व फिडरचे सौरऊर्जिकरण करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून या योजनेत महाराष्ट्रात सोलापूर जिल्हा प्रथम असल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी कौतुक केले.

पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समिती येथे आयोजित कृषी पंढरी कृषी प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी कृषीमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे, पणन मंत्री जयकुमार रावल, आमदार विजय देशमुख, आमदार रणजीत मोहिते पाटील, गोपीचंद पडळकर, समाधान आवताडे, अभिजीत पाटील, माजी आमदार प्रशांत परिचारक, पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, विभागीय कृषी सह संचालक दत्तात्रय गावसाने आदी उपस्थित होते.

उत्पादन खर्च कमी होणे आणि उत्पादकता वाढावी यासाठी राज्य शासन अनेक योजना राबवित आहे , असे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेत गाव हा घटक धरून जलसंधारण, जलनियोजन पासून शेतीच्या यांत्रिकीकरणापासून बाजारसाखळी तयार करण्यापर्यंत पिकाचे एकात्मिक व्यवस्थापन अशा सर्व बाबी गावात पूर्ण करून गावातला छोट्यातला छोट्या शेतकऱ्याला सर्व शासकीय योजनांचा लाभ होईल असा प्रयत्न करण्यात आला आहे. नुकतेच पिक विमा योजना सुधारित केली आहे.

श्री.फडणवीस पुढे म्हणाले, शेतीच्या क्षेत्रात यावर्षीपासून येत्या ५ वर्षात दरवर्षी ५ हजार अशी २५ हजार कोटी रुपये गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये ठिबक संच, कृषी यांत्रिकीकरण, शेततळे, पंप आदी देण्यात येणार असून मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला आहे. गतकाळात निर्णय घेतल्याप्रमाणे साडेसात अश्वशक्ती पर्यंतच्या कृषीपंपांचे वीजबिल आकारले जात नाही.

पांडुरंगाच्या दर्शनासाठी येणाऱ्या वारकरी, शेतकऱ्यांना शेतीतील आधुनिक तंत्रज्ञान आणि योजनांची लहान व मोठ्यातल्या मोठ्या शेतकरी अशा सर्वांना त्यांचा लाभ घेण्याची माहिती मिळावी यासाठी कृषी प्रदर्शन भरवावे अशी अपेक्षा सुधाकरपंत परिचारक यांनी २०१५ साली व्यक्त केली होती. तेव्हापासून दरवर्षी हे प्रदर्शन भरविण्यात येत आहे. यामध्ये शासनाचे विविध विभाग, कृषी विद्यापीठे यांचे स्टॉल, विविध योजना, वेगवेगळ्या व्यावसायिकांनी आणि शेतकऱ्यांनी केलेल्या यशस्वी प्रयोगांचाही या प्रदर्शनात समावेश आहे. एकात्मिक कीड नियंत्रणासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआयचा वापर, उत्पादकता वाढविण्यासाठीच्या वेगवेगळी पद्धतींचेही प्रदर्शन या ठिकाणी पहायला मिळत आहे. सेंद्रिय खते, नैसर्गिक खते, वेगवेगळ्या खतांचे मिश्रणे, माती परीक्षण ते कापणीपर्यंतच्या वेगळगवेगळ्या तंत्रज्ञानाची झलक येथे पाहायला मिळते, तरी शेतकऱ्यांनी या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केले.

शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात पणनच्या योजनांचा लाभ बाजार समित्यांच्या माध्यमातून मिळत आहे. गावातील विकास सहकारी संस्थांचे बहुउद्देशीय संस्थात रूपांतरण करण्याचा केंद्र शासनाच्या प्रयत्न असून १८ प्रकारचे व्यवसाय या संस्थाना करता येणार आहेत. बाजार आणि शेतकऱ्यांमध्ये दुवा ठरण्याचे काम या संस्था करतील. स्टोरेज, कोल्ड स्टोरेज आदी व्यवस्था करून शेतकऱ्यांच्या माल योग्य भावात मोठ्या प्रमाणात माल विकला जाईल असा प्रयत्न असल्याचेही श्री. फडणवीस म्हणाले.

पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समिती अत्यंत प्रगतिशील असून अत्यंत चांगले काम करते. समितीने पणन विभागाच्या सर्व योजनांचा लाभ घेऊन शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावा, असे आवाहन मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केले.

ॲड. कोकाटे म्हणाले, वारकरी आणि शेतकरी हे वारीच्या दोन बाजू आहेत. शेतीत येणाऱ्या तंत्रज्ञानाची वारीत सहभागी शेतकऱ्यांना माहिती देण्यासाठी चांगले प्रदर्शन भरविण्यात आले आहे. शेती चांगली आणि सुरळीत करण्यासाठी राज्य शासन प्रयत्न करीत आहे. या प्रदर्शनात सुमारे २५० स्टॉलच्या माध्यमातून शेतीतील नवनवीन तंत्रज्ञान, पीएमएफएमई योजना, आत्मा, स्मार्ट प्रकल्प आदींची माहिती व प्रदर्शन केले आहे. या योजनांचा लाभ शेतकऱ्यांनी घ्यावा.

सोलापूर जिल्ह्यातील शेतकरी अत्यंत चांगली शेती करतात. केळीची निर्यात मोठी प्रमाणात होते.माशीमुळे डाळिंब आणि इतर फळबागांचे नुकसान टाळण्यासाठी बॅगेज, ठिबक, मलचिंग पेपर आदीं योजनांचा फलोत्पादसाठी शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

राज्य आणि केंद्र सरकार मिळून शेतकरी स्वयंपूर्ण करण्यासाठी प्रयत्न करीत आहे. आपल्याला एआय मध्ये मोठे काम करायचे आहे. त्यासाठी राज्य शासनाने कृषी मध्ये ५००, कोटींची तरतूद केली आहे, असेही ॲड. कोकाटे म्हणाले.

श्री. रावल म्हणाले, पंढरपूर बाजार समिती ही उत्कृष्ट बाजार समिती आहे. केळीचे सर्वात मोठे निर्यात हब सोलापूर जिल्हा आहे. मनुके, द्राक्ष, डाळिंबाच्या क्षेत्रात प्रगती करणारा हा जिल्हा आहे. ड्रॅगन फ्रुटचे लागवड करण्याचे धाडस या तालुक्यात झाले आणि ते यशस्वीही करण्यात आले.

लवकरच एडीबीची योजना राज्यात आणण्याचा प्रयत्न होणार आहे. यामध्ये मार्केट कमिटीची बळकटी करण्यासाठी योजना आणण्यासाठी प्रयत्न होणार. त्यात पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीला प्राधान्य देण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

प्रशांत परिचारक यांनी प्रास्ताविक केले. ते म्हणाले, ही बाजार समिती एक अग्रेसर बाजार समिती आहे. ५५० कोटीच्यावर उलाढाल या बाजार समितीच्या माध्यमातून केली जाते. बेदाण्याचे मोठे मार्केट या बाजार समितीत आहे. चांगल्या प्रकारची शेती या भागातील शेतकरी करतात. मुख्यमंत्री यांनी पंढरपूर हे भविष्यकाळातील एक मोठे तीर्थक्षेत्र होण्यासाठी ध्यास घेतला आहे. प्रशासनाने आषाढी वारीचे अत्यंत चांगले नियोजन केले, असेही ते म्हणाले.

६यावेळी पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती हरीश गायकवाड, उपसभापती राजू गावडे संचालक मंडळ आदी उपस्थित होते.

## संक्षिप्त...

### मायक्रोसॉफ्ट कंपनीने पाकिस्तानमधील कार्यालय केले बंद

इस्लामाबाद : सॉफ्टवेअर क्षेत्रातील बलाढ्य बहुराष्ट्रीय कंपनी मायक्रोसॉफ्टने पाकिस्तानमधील कार्यालय बंद केले आहे. हे कार्यालय पाकिस्तानम ध्ये २५ वर्षांपूर्वी सुरू करण्यात आले होते. आता मायक्रोसॉफ्टने पाकिस्तानमध्ये एक छोटे कार्यालय सुरू ठेवले आहे ज्यात कंपनीचे पाच सदस्य कार्यरत आहेत. पाकिस्तानमध्ये येणाऱ्या मायक्रोसॉफ्टच्या उत्पादनांशी संबंधित व्यवसाय हाताळण्याची जबाबदारी या पाच जणांकडे आहे. पण कंपनीने मोठ्या प्रमाणात व्यवसाय करण्याच्या उद्देशाने सुरू केलेले पाकिस्तानमधील कार्यालय बंद केले आहे. वाढती अस्थिरता, सतत वेगवेगळ्या भागांमध्ये होणाऱ्या हिंसक घटना, वारंवार निर्माण होणारा कायदा - सुव्यवस्थेचा प्रश्न यामुळे पाकिस्तानमधील मोठे कार्यालय बंद करण्याचा निर्णय मायक्रोसॉफ्टने घेतला आहे. कंपनीच्या व्यवस्थापनाने मोठे कार्यालय बंद करण्याचा निर्णय जाहीर करत पाकिस्तानमधील कर्मचाऱ्यांना कळवला आहे. पाकिस्तानमधील कर्मचाऱ्यांसोबतचा करार संपवण्यात आला आहे. मायक्रोसॉफ्ट कंपनीची १९० पेक्षा जास्त देशांमध्ये कार्यालयं आहेत. क्लाउड कॉम्प्युटिंग, आर्टिफिशियल इंटेलिजेंस, सायबर सिक्युरिटी, सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर अशा अनेक क्षेत्रात कंपनी महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. विंडोज, ऑफिस, एज सारख्या उत्पादनांचा वापर जगभर सुरू आहे. जगभरातील बहुसंख्य पीसींमध्ये आजही मायक्रोसॉफ्ट कंपनीचीच ऑपरेटिंग सिस्टिम आहे. यामुळे म ायक्रोसॉफ्ट कंपनीचे पाकिस्तानमधील कार्यालय बंद होण्याची बातमी चर्चेचा विषय झाली आहे.

### तीन दिवस कुणाच्याच लक्षात आलं नाही, शुभमन गिलने केली सर्वात मोठी घोडचूक!

**मुंबई/प्रतिनिधी :** भारत आणि इंग्लंड यांच्यातील दुसऱ्या कसोटीच्या तिसऱ्या दिवशी हॅरी ब्रुक आणि जेमी स्मिथ यांनी ३०३ धावांची भागेदारी केली आणि टीम इंडियाला पुन्हा बॅक्कफूटवर पाठवलं. इथंच शुभमन गिलने मोठी चूक केली. शुभमनने यावेळी चौथ्या बॉलरवर लक्षच दिलं नाही. सुरुवातीच्या २१.४ ओव्हरमध्ये ८४ धावांवर ५ विकेट्स पडल्या. याचा अर्थ, टीमने खूप लवकर विकेट्स गमावल्या आणि त्यांची सुरुवात खराब झाली. त्यानंतर ६१.१ ओव्हरमध्ये ३०३ धावांवर एकही विकेट पडली नाही.

टीम इंडिया आकाश दीप, मोहम्मद सिराज आणि प्रसिद्ध कृष्णा या तीन पेस बॉलिंग लाईनअपने मैदानात उतरली होती. या तिन्ही बॉलरची धार कमी होत असताना शुभमनने चौथा बॉलर गेममध्ये उतरवायला हवा होता. हा बॉलर म्हणजे ऑलराऊंडर नितीश कुमार रेड्डी... नितीश कुमारला शुभमनने खूप उशिरा बॉलिंग दिली. तसेच त्याला फक्त ६ ओव्हर टाकायला मिळाल्या. शार्दुल ठाकूरच्या जागेवर खेळणाऱ्या नितीश कुमारला आपल्या बॉलिंगची किमया दाखवता आली नाही.तसेच हॅरी ब्रुक आणि जेमी स्मिथ यांची ३०३ धावांची भागेदारी टीम इंडियासाठी घातक ठरत असताना एकाही बॉलरला १४५ च्या स्पीडने बॉलिंग करता आली नाही. याचा फटका भारतीय संघाला बसला.

# मोहरमची सवारी उठायची वेळ आणि चक्क मोर अवतारला

## मुस्लिम समाजात दर्गा,सवारी,ताजिया आदी ठिकाणी मोरपिसाला महत्व



दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** मोहरम दरम्यान प्रत्येक ताजिया व सवारी जवळ एक आशीर्वाद देण्याचे प्रचलित साधन म्हणून मोरांच्या गळालेल्या पिसांची मोरचल असते. त्याने आशीर्वाद देण्याची प्रथा पूर्वीपासून सुफी परंपरणे चालत आलेली आहे. अश्यातच मोहरमची ९ जुलै रोजी सवारी उचलल्या जाते आणि सवारी उचलण्याच्या प्रथेला सुरवात होणार त्याचं वेळेस एक मोर उडत आला आणि सवारी जवळच जावून बसला. त्याला पाहणाऱ्याची गर्दी जमा झाली पाहणारे अवाक झाले. डोणगाव येथे पूर्वीपासून मोहरम दरम्यान सवारी बसवण्याची प्रथा असून येथे श्रीराम मठा जवळ बंगला आहे.या ठिकाणी सवारी बसवली जाते. त्याचे ५ जून रोजी मोहरमची ५ तारीख होती. त्या दिवशी सवारी उठवण्याची तयारी सुरु असतांना ४:३० वाजता दरम्यान एक मोर उडत आला आणि सवारी जवळ जावून बसला. त्याला पाहता बघणाऱ्याची गर्दी जमा झाली. तेव्हा हमीद कुरेशी यांनी वन विभागाला कॉल करून मोर आल्याची माहिती दिली व वन विभागाचे घाटबोरी वन परिक्षेत्र अधिकारी अंकुश येऊल यांनी वन रक्षक खोडवे, विणकर यांना पाठवून तो मोर ताब्यात घेतला. यावेळी माजी सरपंच संजय आखाडे, राजेंद्र आवटीसह अनेकांची उपस्थिती होती.

# बदनामीच्या भीतीपोटी विवाहित महिलेची आत्महत्या; दोन जणांवर गुन्हा दाखल

दैनिक आपला विदर्भ

**कारंजा/प्रतिनिधी :** कथित प्रियकराने शारीरिक संबंधाची व्हीडीओ चित्रफित व्हायरल करण्याची धमकी दिल्याने बदनामीच्या भीतीपोटी ४० वर्षीय विवाहित महिलेने गळफास घेऊन आत्महत्या केली. या प्रकरणी ४ जुलै रोजी दोन जणांवर आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्राप्त माहितीनुसार, अफसानाबी सैय्यद युनूस (रा.शाहीन कॉलनी) असे आत्महत्या करणाया महिलेचे नाव आहे. तिचे शेख मोबीन शेख वाजीद नामक कथित प्रियकराशी अनैतिक सबंध होते. विशेष म्हणजे त्याने दोघांमधील खासगी क्षणाची एक व्हीडीओ चित्रफित तयार केली होती आणि त्याद्वारे तो महिलेला शारीरिक संबंध ठेवण्यास भाग पाडत होता. या त्रासाला महिला कंटाळली होती.कथित प्रियकराने माझ्याशी शारीरिक संबंध काय ठेव नाहीतर चित्रफीत सोशल मीडियावर व्हायरल करीन अशी धमकी दिली. तर, त्याने व त्याच्या लहान भावाने संबंधीत महिलेला पोलिसात तक्रार दिली. तर, जिवाने मारण्याची धमकी दिली होती. अखेर सततच्या या त्रासाला कंटाळून विवाहित महिलेने स्वत:च्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली.याप्रकरणी महिलेचा पती सैय्यद युनूस सैय्यद गफ ुर (४५,रा. शाहीन कॉलनी कारंजा) यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी कथित प्रियकर शेख मोबीन शेख वाजीद (३८) व त्याचा भाऊ शेख अमीन शेख वाजीद (३५,दोघेही रा. दाईपुरा कारंजा) यांच्याविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी यातील आरोपी शेख अमीन शेख वाजीद यास अमरावती येथून अटक केली असून, दुसरा आरोपी पसार आहे. घटनेचा अधिक तपास पोलीस निरीक्षक दिनेशचंद्र शुक्ला यांच्या मार्गदर्शनात पोलिस उपनिरीक्षक ठाकरे करीत आहेत.

# अमरावतीत १३ फूट लांबीच्या अजगराने घेतला बकरीचा जीव

**अमरावती/प्रतिनिधी :** तालुक्यातील सुरवाडी खुर्द शेत शिवार परिसरात एका १३ फूट लांबीच्या अजगराने २० किलो वजनाची बकरी गिळण्याचा प्रयत्न केला. ही माहिती सर्पमित्राला मिळताच त्यांच्या अथक प्रयत्नाने अजगराचे प्राण वाचले. मात्र बकरीला यात जीव गम वावा लागला. तालुक्यातील सुरवाडी येथील शेत शिवारात एका १३ फूट अजगराने बकरीला शिकार बनवण्याचा प्रयत्न केला.

सुरवाडी खुर्द शेत शिवारात परिसरातील भूषण भोंबे यांच्या बकऱ्या नेहमीप्रमाणे आजही चरण्यासाठी गेल्या होत्या. त्याच भागात भला म ोठा अजगर दडून बसला होता. अजगराने बकरीवर झडप घालून तिला गिळण्यासाठी विळखा घातला. विळखा मारल्याने अजगराला कमालीचा त्रास होत होता. ही बाब काही लोकांच्या निदर्शनास येताच त्यांनी ही माहिती सर्पमित्र अविनाश पांडे यांना दिली. पांडे यांनी अजगराच्या तावडीतून त्या बकरीला वाचवण्यासाठी खूप प्रयत्न केले. परंतु, बकरीचा यात जीव वाचला नाही. मात्र, अजगराचे प्राण वाचवण्यात ते यशस्वी झाले. सर्पमित्र अविनाश पांडे यांनी अजगराला सुरक्षितपणे पकडल्यानंतर वन विभागात नोंद करून त्याला नैसर्गिक अधिवासात सोडले.

# केद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी उपोषण मंडपाला दिली भेट...! शेतकऱ्यांचा प्रश्न मार्गी लावण्याचे दिले प्रशासनाला निर्देश...!!

दैनिक आपला विदर्भ






**चिखली/प्रतिनिधी :** चिखली तालुक्यातील धोत्रा भनगोजी येथील १४ शेतकऱ्यांनी शेत रस्त्यासाठी उपोषण सुरु केले आहे त्यांच्या उपोषण मंडपास केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी भेट देऊन या शेतकऱ्यांचा प्रश्न मार्गी लावण्यासंदर्भात संबधीत अधिकऱ्याला निर्देशीत केले


चिखली तालुक्यातील धोत्राभंगोजी येथील विलास हळदे शिवदास कापसे संजय गुजर दुर्गाबाई कापसे मिनाबाई गुजर वर्षा बाई गुजर सुवर्णाबाई भालेकर यांच्यासह १४ शेतकऱ्यांच्या शेत जमिनीसाठी जाणारा शेत रस्ता हा गट क्रमांक २०० मधून दिलेला आहे परंतु अद्याप पर्यंत हा रस्ता वहिवाटीसाठी खुला करण्यात आलेला नाही त्यामुळे या रस्त्यावरील शेतकऱ्यांना त्यांच्या शेतामध्ये जाता येत नाही पर्यायाने त्यांची पेरणी थांबली आहे पर्यायाने ३० ते ४० एकर जमीन ही पडीत पडली आहे . पडीत पडलेल्या जमिनीत पेरणी करण्यासाठी शेत रस्ता खुला करून द्यावा या मागणीसाठी या १४ शेतकऱ्यांनी बुलढाणा येथे उपोषण सुरू केले आहे ४ जुलै रोजी केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव हे बुलढाणा जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना त्यांनी या शेतकऱ्यांच्या उपोषण मंडपाला भेट दिली व त्यांची समस्या ऐकून घेत यावर तात्काळ उपाययोजना करण्याच्या दृष्टिकोनातून चिखली येथील तहसीलदारांशी दूरध्वनीहून संपर्क साधला या शेतकऱ्यांचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना ही त्यांनी यावेळी केल्यात .

# भीषण अपघातात एकाच कुटुंबातील चार ठार !

## समृद्धी महामार्गावरील घटना : उमरेडच्या जयस्वाल कुटुंबावर शोककळा

दैनिक आपला विदर्भ

**वाशीम/प्रतिनिधी :** भरधाव कारवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने घडलेल्या भिषण अपघातात उमरेड (जि. नागपूरा) येथील एकाच कुटुंबातील चौघांचा मृत्यू झाला. तर, चालक गंभीर जखमी झाला आहे. त्याच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अपघात एवढा भिषण होता की, ईर्टिगा वाहनाचा जागीच चक्काचूर झाला आहे. ही घटना ३ जुलै रोजी संध्याकाळी ७.३० वाजता शेलूबाजार (वाशीम) इंटरचेंज जवळ घडली. प्राप्त माहितीनुसार उमरेड (जि. नागपूर) येथील जयस्वाल परिवार पुणे येथील नातेवाईकांकडील कौटुंबिक कार्यक्रमासाठी गेले होते. कार्यक्रम आटोपून एम.एच.४० बी.जे. ७२०६ क्रमांकाच्या ईर्टिगा कारने ३ जुलै रोजी समृद्धी महामार्गाने परत आपल्या गावी उमरेडकडे निघाले होते.दरम्यान, भरधाव वाहनावरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने समृद्धी महामार्गावरील शेलूबाजार नजीकच्या चॅनल नंबर २१५ वर सदर वाहनाचा भिषण अपघात झाला. या अपघातात वैदेही जयस्वाल आणि माधुरी जयस्वाल यांचा जागीच मृत्यू झाला. तर, राधेश्याम जयस्वाल, संगीता जयस्वाल आणि चालक चंदन हेलगे हे तिघेजण गंभीर जखमी झाले होते. सदर अपघाताची माहिती समृद्धी महामार्गावरील कंट्रोल रुमला मिळताच संबंधीत यंत्रणेने तत्परतेने अपघातग्रस्तांना रुग्णवाहिकेद्वारे वाशीम येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. त्यानंतर अपघाताची माहिती रात्रीच त्यांच्या नातलगांना देण्यात आली.तर,राधेश्याम जयस्वाल आणि संगीता जयस्वाल या दोघा जखमीवर उपचार सुरू असताना दोघांचाही उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्यामुळे अपघातात मृत्यू पावलेल्यांची संख्या चारवर जाऊन पोहचली. चालक चंदन हेलगे यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. वाशीम येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आल्यानंतर सदर मृतदेह त्यांच्या नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले.
















### अशी आहेत मृतांची नावे

वाशीम जिल्ह्यात समृद्धी महामार्गावर घडलेल्या अपघातात उमरेड येथील जैस्वाल यांच्या एकाच कुटुंबातील चौघांचा मृत्यू झाला. त्यामध्ये वैदेही किर्ती जयस्वाल (वय २४ , ईतवारी पेठ उमरेड), संगीता अजय जयस्वाल (वय ५२ हनुमान नगर, नागपूर), माधुरी किर्ती जयस्वाल (वय ५२ ईतवारी पेठ उमरेड), राधेश्याम शिवनारायण जयस्वाल (वय ६६ इतवारी पेठ उमरेड) अशी मृतकांची नावे आहेत.

### माय लेकीच्या मृत्युने समाजमन हेलावले !

अपघात इतका भिषण होता की, गाडीच्या पुढील भागाचा पूर्णपणे चुराडा झाला.अपघाताची माहिती मिळताच रुग्ण वाहिका आणि पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली.सदर अपघातात वैदेही आणि तिची आई माधुरी या दोघींचा घटनास्थळीच मृत्यू झाला. अपघातात गंभीर जखमी असलेले राधेश्याम जयस्वाल आणि संगीता जयस्वाल या दोघांना तातडीने उपचारासाठी वाशीम जिल्हा रुग्णालयात दाखल केले. परंतु,दोघांचाही उपचारा दरम्यान मृत्यू झाला. सध्या चालक चेतन हेलगेची प्रकृती चिंताजनक असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

## विविध वृत्त...

### आरोपीस अटक करण्याची मागणी, महादेव मुठाळ यांचे पोलीस अधीक्षकांना निवेदन

दैनिक आपला विदर्भ

**वाशीम/प्रतिनिधी :** मुलावर झालेल्या जीवघेण्या हल्ल्यातील आरोपीविरुद्ध मालेगाव पोलीस स्टेशनला गुन्हे दाखल झाल्यानंतर सुद्धा आरोपींना मालेगाव पोलिसांनी आरोपींना अटक केली नाही त्यामुळे आपण याकडे लक्ष देऊन सदर गुन्ह्यातील आरोपींना अटक करण्याचे निर्देश द्यावे, अशी मागणी मालेगाव तालुक्यातील चिवरा येथे महादेव हरी मुठाळ यांनी पोलीस अधीक्षक यांना निवेदनाद्वारे चार जुलै रोजी केली आहे.

निवेदनात नमूद केले आहे की,२२ जून रोजी मुलगा समाधान मुठाळ याच्यावर आरोपीने जिवघेणा हल्ला केला त्यामध्ये त्याला गंभीर दुखापत झाली असून मालेगाव पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यामध्ये नारायण मुठाळ, किसना मुठाळ, मोतीराम मुठाळ, गोलु मुठाळ, विकास मुठाळ व दोन महिला आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २५ जून रोजी आरोपी विरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला.

आजपर्यंत सर्व आरोपी हे फरार आहेत. गावातील काही लोकांसोबत कुठल्या ना कुठल्या प्रकारे संपर्क सुरू आहे व त्यांना मदत करीत आहे.तरी योग्य ती कार्यवाही करून फरार सर्व आरोपींना अटक करण्यात यावी, अशी मागणी महादेव हरी मुठाळ यांनी पोलीस अधीक्षक यांना ४ जुलै रोजी निवेदनाद्वारे केली आहे.

### अल्पवयीन मुलीस फुस लावुन पळवणाया आरोपीस अटक

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** अल्पवयीन मुलीस लग्नाचे आमिष देऊन फूस लावून पळवून नेणाया आरोपीला नाशिक येथून ३ जुलै रोजी अटक करण्यात आली आहे. सदर कारवाई रिसोड पोलीस व अँटी ह्यूमन ट्रेकिंग युनिट(एएचटीयू) च्या संयुक्त विद्यमानाने रिसोड पोलीस स्टेशनचे ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली. आकाश बबन सपकाळ वय २५असे आरोपीचे नाव असून सध्या रिसोड पोलिसांच्या रिमांडमध्ये आहे. प्राप्त माहितीनुसार रिसोड शहरातील एका अल्पवयीन १६ वर्षीय मुलीस आकाश बबन सपकाळ याने २१ मार्च २०२३ रोजी लग्नाचे आमिष देऊन फूस लावून पळवून नेले होते. सदर प्रकरणाची तक्रार अल्पवयीन पीडित मुलीच्या आई-वडिलांनी नोंदवली होती. सदर प्रकरणाचा तपास करत असताना तब्बल दोन वर्षांनतर सदर आरोपी व अल्पवयीन मुलगी नाशिक येथे मिळाले. एएचटीयूच्या टीमने दोघांनाही नाशिक येथून ताब्यात घेऊन ३ जुलै रोजी सकाळी रिसोड पोलिसांच्या स्वाधीन केले. सदर कारवाई पोलीस उपनिरीक्षक संतोष आघाव, रवी इरतकर,वृषाली ढगे यांनी केली असून पुढील तपास ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक संतोष आघाव करीत आहेत.



## ठाकरे बंधू एकत्र आल्याने काही फरक पडणार नाही

### शिवसेना आमदार संजय गायकवाड यांची टिका

दैनिक आपला विदर्भ



**बुलढाणा/प्रतिनिधी :** जगात आज टिकायचे असेल तर,अनेक भाषा शिकायला हव्यात. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे पंधरा वर्षांपूर्वीच एकत्रित आले असते तर काही फरक पडला असता. परंतु,त्यांनी फार उशीर केला. आता ते एकत्रित आल्याने महाराष्ट्रात काही फरक पडेल,असे मला वाटत नाही. ठाकरे नावाचा ब्रँड जर असता बाळासाहेब जिवंत असतानाच २८८ जागा निवडून आल्या असत्या. त्यावेळीही ७०-७४ च्या पुढे शिवसेना जात नव्हती. आता हे दोन भाऊ एकत्र आल्याने काही फरक पडणार नाही. अशी टिका शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी लातूर जिल्ह्यातील हाडोळती या ठिकाणी माध्यमांशी बोलताना केली. यावेळी ते म्हणाले की, मागील काही दिवसांपासून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे हे पहिलीपासून हिंदी सक्तीविरोधात एकत्र आले आहेत.त्यांनी मुंबईत संयुक्त मोर्च्याची तयारी केली. यानंतर महायुती सरकारने माघार घेत हिंदी सक्तीचा अध्यादेश मागे घेतला. यापाठोपाठ आज, शनिवारी वरळी डोम येथे दोन्ही पक्षांचा संयुक्त विजयोत्सव मेळावा पार पडला. यामुळे ठाकरे बंधू एकत्र येणार, राज्याचे राजकारण बदलणार, अशा चर्चा रंगल्या. ठाकरे ब्रँडवरून रान पेटले, महाचर्चा सुरू झाल्या, वाद पेटले. या वादंगात आता बुलढाणा विधानसभा मतदारसंघांचे आक्रमक व वादग्रस्त रोखठोक विधानांसाठी प्रसिद्ध असलेले शिंदेसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी उडी घेतली आहे.बहुचर्चित ठाकरे ब्रँडची त्यांनी खिल्ली उडवली. त्यांची यासंदर्भातील पोस्ट सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत आहे. ठाकरे ब्रँड असता तर तेव्हाच विधानसभेच्या २८८ जागा जिंकल्या असत्या, अशी उपरोधीक टीका त्यांनी केली.

### तर अनेक भाषा शिकायला हव्यात

पाकिस्तानचा दहशतवाद रोखायचा असेल तर उर्दू अवगत असली पाहिजे,परराज्यात गेल्यावर तिथे आपण मराठीत बोलणार का? असा प्रश्न उपस्थित करून जगात टीकायचे असेल तर सगळ्या भाषा अवगत असल्या पाहिजेत, असेही ते म्हणाले. पाकिस्तानचा दहशतवाद ओळखायचा, रोखायचा असेल तर आपणाला उर्दू भाषा ही अवगत असली पाहिजे, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.तसेच जो कोणी महाराष्ट्रात राहून मराठी बोलण्याची लाज वाटते, असे म्हणतो, त्याचे थोबाड फोडले पाहिजे. मराठीचा अपमान आपण सहन करता कामा नये, असेही आमदार संजय गायकवाड यांनी ठणकावून सांगितले.

## मंगरूळपीर येथे बालकामगार मुक्ती मोहीम, तीन बालकांची सुटका

**मंगरूळपीर/प्रतिनिधी :** जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस.यांच्या निर्देशानुसार व बाल व किशोरवयीन कामगार प्रतिबंध व नियमन अधिनियम, १९८६ (सुधारणा २०१६) अंतर्गत मंगरुळपीर येथे ३ जुलै रोजी विशेष धाडसत्र राबविण्यात आले. या मोहिमेदरम्यान दोन आस्थापनांवर छापा टाकून तीन बालकामगारांची मुक्तता करण्यात आली. या कारवाईत आई जगदंबा ऑटोमोबाईल्स अँड सर्विसिंग सेंटर (श्याम लुंगे) आणि भोलेनाथ मोटार गॅरेज (अक्षय राऊत) या आस्थापनांमध्ये बालकामगार कार्यरत असल्याचे आढळले. कृती दलाने तत्काळ बालकामगारांची सुटका करून संबंधीत मालकांविरुद्ध मंगरुळपीर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. सदर मोहिमेमागील उद्देश म्हणजे बालकामगार या अनिष्ट प्रथेचे समुळ उच्चाटन करणे असून यावेळी आस्थापनांना बालकामगार न ठेवण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले.सदर कारवाई कामगार उपआयुक्त चंद्रकांत राऊत, सहाय्यक कामगार आयुक्त राहुल काळे, सहाय्यक कामगार आयुक्त श्रद्धा वाघमारे, तसेच सरकारी कामगार अधिकारी पंकज खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली योगेश गोटे, किशोर शेळके,गणेश काळे, निलिमा भोंगाडे,शबनम नंदावाले,समीर शेख यांनी केली.

## ती अन्यायकारक कारवाई मागे घ्या; अन्यथा असहकार आंदोलन; महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियनचे गटविकास अधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे इशारा

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** ग्रामपंचायत अधिकारी दिपक तांबारे व विजयकुमार धोंडगे यांच्या झालेली अन्यायकारक कारवाई मागे घ्यावी,अन्यथा असहकार आंदोलन करण्यात येईल, असा इशारा महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियनचे अध्यक्ष दत्ता काळे,सचिव शेषराव शिंदे, कार्याध्यक्ष विलास गायकवाड यांनी मेहकर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना निवेदनाद्वारे दिला आहे. निवेदनात नमुद केले आहे की, डोणगाव ग्रामपंचायतीचे अधिकारी दिपक तांबारे व विजयकुमार धोंडगे यांच्यावर २ जुलै रोजी आपण कोणतीही शहानिशा न करता, पूर्व सुचना न देता राजकीय दबासास बळी पडून निलंबनाची कार्यवाही केलेली आहे.त्याचप्रमाणे यापूर्वी देखील ग्रामपंचायत अधिकारी यांचा काहीही दोष नसताना त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. यावरून ग्रामपंचायत अधिकारी संवर्गावर आपल्या मनात रोष दिसून येते आहे. उपरोक्त केलेली कार्यवाही ही अन्यायकारक असून ग्रामपंचायत अधिकारी संवर्गात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. तरी, झालेली कार्यवाही ७ जुलैपर्यंत मागे घ्यावी, अन्यथा ७ जुलैपासून ग्रामपंचायत अधिकारी यांच्यावतीने असहकार आंदोलन करण्यात येईल, असा इशारा दिला आहे. निवेदनावर ग्रामपंचायत युनियनचे तालुकाध्यक्ष दत्ता काळे,सचिव शेषराव शिंदे, जिल्हाकार्याध्यक्ष विलास गायकवाड यांच्यासह इतर पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## ढाणकी येथे ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयास मंजुरी प्रदान करा

### शिवसेना (शिंदे) गटाचे आरोग्य सहसंचालकांना निवेदनाद्वारे मागणी

दैनिक आपला विदर्भ

■ महेबूब शेख




**उमरखेड :** तालुक्यातील ढाणकी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे श्रेणीवर्धन ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालयामध्ये रूपांतर लवकरात लवकर करावे,अशी मागणी ढाकणी येथील शिवसेना (शिंदे) गटाच्यावतीने यवतमाळ जिल्हा रुग्णालयाचे जिल्हा शल्यचिकित्सक यांच्यामार्फत आरोग्य विभगाचे सहसंचालक यांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनात नमुद केले आहे की,ढाणकी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्याबाबतचा प्रस्ताव, जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, यवतमाळ यांचे पत्र तसेच उपसंचालक आरोग्य सेवा, अकोला मंडळ, यांचे वरील विषयासंदर्भात पत्र सहसंचालक आरोग्य सेवा,रुग्णालये (राज्यस्तर) मुंबई येथील कार्यालयास प्राप्त झाले असून, पुढील कार्यवाहीस्तव ढाणकी ता. उमरखेड जि. यवतमाळ येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे श्रेणीवर्धन ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय मध्ये रूपांतर लवकरात लवकर करावे, याकरिता शिवसेना (शिंदे) ढाणकी तर्फे जिल्हा शल्यचिकित्सक यवतमाळ मार्फत सहसंचालक आरोग्य सेवा रुग्णालये राज्यस्तर मुंबई यांना निवेदन देण्यात आले. तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांना सुद्धा,ढाणकी व परिसराची मागणी पाहता याप्रकरणी गांभीर्याने लवकरात लवकर लक्ष घालून काम पूर्ण करावे,अशी मागणी शिवसेना (शिंदे) गटातर्फे निवेदनातून करण्यात आली. याप्रसंगी शिवसेना तालुकाप्रमुख प्रवीण पाटील मिराशे, शिवसेना ढाणकी शहर प्रमुख संजय सल्लेवाड, सुनील मांजरे, शेख इरफान व सुरेश जाधव यांची उपस्थिती होती.

## आषाढी वारीत साक्षरतेची पालखी वझर आघाव जिल्हा परिषद शाळेची आगळी वेगळी रॅली

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

### जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा वझर आघाव येथील शालेय विद्यार्थी व शिक्षकांनी आषाढी एकादशीच्या पुर्वसंध्येला एक आगळा वेगळा उपक्रम राबवला



**बिबी :** वारीच्या भक्तिमार्गात ज्ञानाची पालखी!या शिर्षका अंतर्गत वझर आघाव जिल्हा परिषद शाळेतील १ ली ते ७ वीच्या विद्यार्थ्यांची साक्षरता रॅली काढून गावात शिक्षणाबद्दल जनजागृती केली आषाढी वारीच्या पवित्र काळात पंढरपूरकडे जाणाऱ्या संतांची पाऊले जशी भक्तीचा संदेश देतात, तशीच गावागावात ज्ञानाचा संदेश पोचवण्यासाठी वझर आघाव येथील जिल्हा परिषद शाळेतील १ ली ते ७ वीचे विद्यार्थी, शिक्षक व पालकांनी मिळून साक्षरता रॅली काढली.

या रॅलीमध्ये मुलांनी हातात शालेय गुणवत्तेचे फलक, 'साक्षर गाव समृद्ध गाव', 'आमची शाळा आमचा अभिमान' यांसारखे स्लोगनचे बॅनर घेऊन गावभर फिरत गावकऱ्यांना शिक्षणाचे महत्त्व सांगितले.या आगळ्या वेगळ्या रॅलीत मुलांनी केलेल्या वारकरी वेशभूषा विठ्ठल रखुमाईची वेशभूषा केलेल्या विद्यार्थ्यांचे गावातील महिलांनी पुजन केले. तर शिक्षक व मुला मुलींना साक्षरता गीतांवर नृत्य सादर करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले.तर या आगळ्यावेगळ्या रॅलीचे गावकऱ्यांनी शिक्षक वृंद यांचे तोंडभरून कौतुक केले.या रॅलीत जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापक शिक्षकवृंद, ग्रामपंचायत सरपंच उपसरपंच सदस्य शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष उपाध्यक्ष सदस्य गावकरी व भजनी मंडळ यांनी या रॅलीचे स्वागत करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.